आरोग्य सेवा संचालनालयाच्या अधिपत्याखालील क्ष-किरण तंत्रज्ञ या पदाच्या पदनामात बदल करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः पनाब-२०१५/प्र.क्र.२९५/सेवा-५
गो. ते. रुग्णालय, संकुल इमारत,१० वा मजला
मंत्रालय, मुंबई-०१
दिनांक: २० जानेवारी,२०१८

वाचा -

१) **संचालक आरोग्य सेवा,आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.आसेसं/आस्था/कक्ष-५/टे-२ /पदनाम बदल/संघटना/१२ दि.०९.११.२०१२**

प्रस्तावना -

क्ष-किरण तंत्रज्ञ या पदाच्या पदनामात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार क्ष-किरण तंत्रज्ञ यांच्या पदनामात पुढील प्रमाणे बदल करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय -

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील संचालक आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई यांच्या अधिपत्याखालील **"क्ष-किरण तंत्रज्ञ"**(वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० + ग्रेड पे रु.४२००) या पदाचे सध्याचे पदनाम बदलुन ते **" क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी"** (वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० + ग्रेड पे रु.४२००) असे करण्यात येत आहे.

२. उपरोक्त प्रमाणे पदनामात बदल झाल्यामुळे या पदाचे वेतन व भत्ते तसेच कर्तव्य व जबाबदा-यांमध्ये कोणताही फरक पडणार नाही. तसेच भविष्यात नामसाधर्म्याच्या आधारे उच्च वेतनश्रेणीची आणि पदनामातील अधिकारी या उल्लेखामुळे या संवर्गास राजपत्रित दर्जा देण्याची मागणी करता येणार नाही.

३. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१७७४/२०१५/का.१२ दि.१३.०१.२०१६ रोजी मिळालेल्या संमतीनुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११७१३०७१४३६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay R More

Digitally signed by Sanjay R More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7256abb8dd472637941e581488fb02eda9e0d6b701c434bcf471a0d525f80681, cn=Sanjay R More
Date: 2018.01.20 11:39:12 +04'30'

(संजय मोरे)
उप सचिव ,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय मुंबई-३२
२. मा. मंत्री (सा.आ. व कु.क.) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२

३. मा. राज्यमंत्री (सा.आ. व कु.क.) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२
४. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
५. संचालक आरोग्य सेवा,आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई
६. सहसंचालक आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन),मुंबई
७. सहसंचालक (अर्थ व प्रशासन) पुणे
८. सहसंचालक आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) पुणे
९. सहसंचालक आरोग्य सेवा (सर्व)
१०. उपसंचालक आरोग्य सेवा (सर्व)
११. जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
१२. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
१३. जिल्हा हिवताप अधिकारी (सर्व)
१४. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
१५. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१६. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१२),मंत्रालय, मुंबई-३२
१७. उप सचिव, वित्त विभाग (सेवा-९),मंत्रालय,मुंबई-३२
१८. निवडनस्ती (सेवा-५)